**<u>प्रेसनोट दिनांक ०६/०७/२०१९</u>**
**<u>येरवडा पोलीस स्टेशन, पुणे</u>**

**<u>कम्युनिटी पोलीसींग व सहकार्यातून सुरक्षेकडे ( सीसीटीव्ही कॅमेरा वॉच ) या संकल्पनां अंतर्गत कल्याणीनगर पुणे भागातील हॉटेल्स, बँक, आस्थापनांना भेटी देऊन त्यांना सुरक्षिततेे संदर्भात मागदर्शन करून सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेबाबत मार्गदर्शन केले बाबत.</u>**

---

कम्युनिटी पोलीसींग व सहकार्यातून सुरक्षेकडे ( सीसीटीव्ही कॅमेरा वॉच ) या संकल्पनां अंतर्गत श्री.राजेंद्र कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, येरवडा पो.स्टे. यांचे मार्गदर्शनाखाली येरवडा पो.स्टे.कडील पो.उप.निरी. श्री. व्ही.जे.माने यांनी दि.२९/०६/२०१९ रोजी १८:०० वा. ते १९:३० वा.चे दरम्यान येरवडा पो.स्टे.चे हद्दीतील कल्याणीनगर भागातील (१) लोकमान्य मल्टीपर्पज बँक (२) हॉटेल द फ्लॉवर वर्कस् (३) हॉटेल केरला कॅफे (४) हॉटेल डेरीओज् रेस्टॉरंट व इतर २ सोसायटया या ठिकाणी भेटी देऊन तेथील व्यवस्थापक/मालक, चालक यांना सहकार्यातून सुरक्षेकडे ( सीसीटीव्ही कॅमेरा वॉच ) या संकल्पनांबाबत माहिती देऊन गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी तसेच दाखल झालेले गुन्हे उघडकीस आणण्यासाठी व सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सीसीटीव्ही कॅमेरांचे महत्व समजावून सांगून त्यांना त्यांचे आस्थापनेमध्ये व सोसायटीमध्ये अंतर्गत भागात तसेच बाहेरील परिसर, रस्ते कव्हर होतील अशा रितीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेबाबत आवाहन करून तसे लेखी पत्र दिले आहे. तसेच त्यांना पोलीस आयुक्त कार्यालयाकडून नागरिकांसाठी राबविण्यात येणारे विविध १४ योजनांची माहिती देऊन मार्गदर्शन केले आहे.

अशा प्रकारे श्री.राजेंद्र कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली येरवडा पोलीस स्टेशन कडील पो.उप.निरी. श्री. व्ही.जे.माने यांनी कम्युनिटी पोलीसींग व सहकार्यातून सुरक्षेकडे ( सीसीटीव्ही वॉच प्रकल्प ) या संकल्पने अंतर्गत येरवडा पो.स्टे.चे हद्दीतील कल्याणीनगर भागातील वरील एकूण ६ ठिकाणी भेटी देवून त्यांना सुरक्षेबाबत मार्गदर्शन करून सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत आवाहन करून लेखी पत्र देऊन उल्लेखनिय कामगिरी केली आहे.









